विमुक्त जाती भटक्या जमाती, इतर मागासवर्ग आणि विशेष मागास प्रवर्ग कल्याण या विभागासाठी उप सचिव संवर्गाचे एक पद नव्याने निर्माण करण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
विजाभज, इमाव व विमाप्र कल्याण विभाग,
शासन निर्णय क्र.आस्थाप्र -२०१९/प्र.क्र.८४/आस्थापना
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, विस्तार भवन, मुंबई-४०० ०३२.
दिनांक : २२ ऑगस्ट, २०१९.

वाचा:-

१. शासन अधिसूचना, सामान्य प्रशासन विभाग क्र.शाकानि-२०१७/प्र.क्र.३३/१८(रवका), दि.०९.०३.२०१७
२. शासन निर्णय, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, क्र.आस्थाप्र-२०१७/प्र.क्र.१९७/आस्था-१, दि.०९.०६.२०१७.
३. शासन निर्णय, विजाभज, इमाव व विमाप्र कल्याण विभाग क्र.आस्थाप्र-२०१७/प्र.क्र.११/आस्था-१, दि.०६.१२.२०१७.
४. शासन निर्णय, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, क्र.आस्थाप्र-२०१७/प्र.क्र.२६४/आस्था-१, दि.२५.०६.२०१९.

प्रस्तावना:-

विमुक्त जाती भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागास प्रवर्ग कल्याण विभाग या नवनिर्मित विभागाच्या कामाचे स्वरुप पाहता या विभागासाठी नवीन पदे निर्माण करण्यासंदर्भात मा.मुख्य सचिव यांच्या अध्यक्षतेखाली बैठक झाली. सदर बैठकीत घेण्यात आलेल्या निर्णयानुसार या विभागासाठी उपसचिव या संवर्गाचे एक पद निर्माण करण्यास उच्च स्तरीय समितीने दि.१३.०८.२०१९ च्या बैठकीत मान्यता दिली असून सदरचा पद निर्मितीचा प्रस्ताव तातडीने मा.मंत्रीमंडळासमोर सादर करावा असे निदेश दिले आहेत.

२. मा.मंत्रीमंडळाच्या दि.१७.१२.२०१६ रोजी झालेल्या बैठकीत घेण्यात आलेल्या निर्णयानुसार सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागातून विमुक्त जाती भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागास प्रवर्ग कल्याण विभाग या विभागाची नव्याने निर्मिती करण्यात आली आहे. याबाबतची अधिसूचना सामान्य प्रशासन विभागाने दि.०९.०३.२०१७ रोजी प्रसिध्द केली आहे. त्यानुसार या विभागाकडे एकूण १६ योजना दर्शविण्यात आल्या आहेत. त्यानंतर सामाजिक न्याय विभागाने

दि.२६.०६.२०१९ च्या शासन निर्णयान्वये १) मराठा आरक्षण, २) सामाजिक व शैक्षणिक मागासवर्ग कल्याण, ३) राज्य मागासवर्ग आयोग, ४) इतर मागासवर्ग, विमुक्त जाती भटक्या जमाती व विशेष मागास प्रवर्ग यांचे सूचीमध्ये एखादी जात समाविष्ट करणे, ५) सामाजिक व शैक्षणिक मागास प्रवर्ग विमुक्त जाती, भटक्या जमाती व विशेष मागास प्रवर्ग या संवर्गाच्या जातविषयक सर्व बाबी, ६) छत्रपती शाहू महाराज संशोधन, प्रशिक्षण व मानव विकास संस्था (सारथी) हे विषय या विभागाकडे वर्ग करण्यात आले आहेत.

३. त्यानंतर धनगर समाजासाठी नवीन २२ योजना हा विषय या विभागाकडे वर्ग करण्याचा निर्णय घेतला आहे. तसेच विमुक्त जाती भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागास प्रवर्ग तसेच इतर दूर्लक्षित व वंचित घटक यांच्यासाठी विविध उपक्रम राबविण्यासाठी महात्मा ज्योतिबा फुले संशोधन व प्रशिक्षण संस्था स्थापन करण्याचा निर्णय मा.मंत्रीमंडळाच्या दि.३०.०७.२०१९ रोजी झालेल्या बैठकीत घेण्यात आला आहे. त्यानुसार दि.०८.०८.२०१९ रोजी शासन निर्णय निर्गमित करण्यात आला आहे.

४. सद्य:स्थितीत या विभागाकडील ५१ पदांचा आकृतीबंध आहे.

अ.क्र.	**पदनाम**	**मान्यता प्राप्त पदे**	**एकूण भरलेली पदे**	**रिक्त पदे**
१	प्रधान सचिव / सचिव (भा.प्र.से.)	१	१	--
२	सह सचिव / उप सचिव	२	२	--
३	अवर सचिव	२	--	२
४	कक्ष अधिकारी	७	५	२
५	सहायक कक्ष अधिकारी	१४	१३	१
६	निवडश्रेणी लघुलेखक	१	१	--
७	उच्चश्रेणी लघुलेखक	१	२ (१ अतिरिक्त पद कार्यरत आहे)	-१
८	निम्नश्रेणी लघुलेखक	३	१	२
९	लिपिक टंकलेखक	९	९	--
१०	वाहन चालक	१	--	१
११	शिपाई	१०	३	७
	एकूण	**५१**	**३५**	**१७**

या विभागाकडे असलेल्या कामाचे स्वरुप व कामाचा व्याप पाहता या विभागासाठी असलेल्या ५१ पदे अपूरी असून, तूर्त उपसचिव संवर्गातील एक पद निर्माण करण्याचा प्रस्ताव दि.२० ऑगस्ट, २०१९ रोजी झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत सादर करण्यात आला होता. मा.मंत्रिमंडळाने घेतलेल्या

निर्णयानुसार या विभागासाठी उपसचिव संवर्गातील एक पद निर्माण करण्याच्या प्रस्तावास मान्यता देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय:-

शासन याद्वारे विमुक्त जाती भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागास प्रवर्ग कल्याण विभागासाठी एस-२५ (७८,८००-२,०९,२००) या वेतनश्रेणीतील उप सचिव संवर्गातील एक पद नव्याने निर्माण करण्यास मान्यता देण्यात येत आहे. यासाठी येणारा खर्च विभागाच्या मंजूर अनुदानातून भागविण्यात यावा. सदर पद भरण्याची कार्यवाही सामान्य प्रशासन विभागाने तात्काळ करावी.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध असून त्याचा संगणक सांकेतांक २०१९०८२२१५१५३७२८२२ आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Bhaurao Raghunath Gavit

Digitally signed by Bhaurao Raghunath Gavit
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=VJNT OBCS SBC Welfare Dept., postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=692454783803b1bf08be0ff2505a01eb578c61edfbb827457be5704f5b440067, serialNumber=950bc6a64b0801087d4b403d7351619557bcd3489ca14b4e0f644bf05a04e89c, cn=Bhaurao Raghunath Gavit
Date: 2019.08.22 15:28:06 +05'30'

(भा.र.गावित)

सह सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

१. मा.राज्यपाल यांचे सचिव, मलबार हिल, मुंबई.
२. मा.मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव
३. मा.मंत्री/राज्यमंत्री (विजाभज, इमाव व विमाप्र कल्याण) यांचे खाजगी सचिव
४. मा.विरोधी पक्षनेता, विधान परिषद/विधानसभा, विधान भवन, मुंबई
५. सर्व विधान परिषद/ विधानसभा सदस्य, विधान भवन, मुंबई
६. अप्पर मुख्य सचिव (सेवा) सामान्य प्रशास विभाग, मंत्रालय, मुंबई
७. अप्पर मुख्य सचिव (वित्त) सामान्य प्रशास विभाग, मंत्रालय, मुंबई
८. सर्व मंत्रालयीन विभागाचे अप्पर मुख्य सचिव/प्रधान सचिव/ सचिव, मंत्रालय, मुंबई
९. महाप्रबंधक, उच्च न्यायालय, मुंबई
१०.महालेखापाल-१ (लेखापरीक्षा व लेखा अनुज्ञेयता), मुंबई
११.अधिदान व लेखाधिकारी, मुंबई
१२.प्रधान सचिव, विजाभज, इमाव व विमाप्र कल्याण विभाग, मंत्रालय, मुंबई
१३.प्रधान सचिव, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, मंत्रालय, मुंबई

१४.संचालक, विजाभज, इमाव व विमाप्र कल्याण संचालनालय, पुणे

१५.सह सचिव/ उप सचिव, विजाभज, इमाव व विमाप्र कल्याण विभाग यांचे स्वीय सहायक

१६.सर्व कक्ष अधिकारी, विजाभज, इमाव व विमाप्र कल्याण विभाग, मंत्रालय, मुंबई

१७.वित्त विभाग (व्यय-१५/आ.पु.क), मंत्रालय, मुंबई

१८. सामान्य प्रशासन विभाग (कार्या-१४), मंत्रालय, मुंबई

१९.निवडनस्ती (आस्था-१)